॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७८/२०२५** **दि.२२/१२/२०२५**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करणे संदर्भात मुदतवाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** १) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५, दि.२४/११/२०२५.
२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५, दि.०९/१२/२०२५.

**महोदय/ महोदया,**

विद्यापीठाच्या वरील संदर्भिय क्र.१ च्या पत्रानुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये तसेच मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करण्याबाबत दि.१०/१२/२०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे कळविण्यात आले होते. तथापी ऑनलाईन माहिती भरण्यास महाविद्यालयांना/ परिसंस्थांना तांत्रिक अडचण निर्माण होत असल्याने माहिती भरण्यास व प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठाने वरील संदर्भिय क्र. २ च्या पत्रानुसार दि.२२/१२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती परंतु मुदतवाढ देवूनही फक्त १०९ महाविद्यालयांनी/ परिसंस्थांनी प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले आहे. तरीही बऱ्याच महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती भरुन प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले नाहीत. सदर बाब ही अत्यंत गंभीर असुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींच्या उल्लंघन करणारे आहे.

यापत्राव्दारे अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार विद्याविषयक लेखापरिक्षा पध्दतीने महाविद्यालयांचे संलग्नीकरण चालू ठेवण्यावर आणि परिसंस्था मान्यता चालु ठेवण्यासाठी संलग्नीत महाविद्यालयांची व परिसंस्थांनी वरील कालावधीत ऑनलाईन माहिती भरुन शैक्षणिक अंकेक्षणासाठी प्रस्ताव निर्धारीत वेळेत सादर करणे बंधनकारक आहे. याची गांभीर्याने नोंद घ्यावी, ही विनंती.

ज्या महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती भरुन प्रस्ताव सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना **दि.३१/१२/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यानंतर कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची कृपया नोंद घेवुन संदर्भ क्र. १ व २ मध्ये नमुद केलेल्या पत्रातील सुचनेनुसार ऑनलाईन माहिती भरुन हार्ड कॉपी सह प्रस्ताव फाईलमध्ये सादर करावे.

तसेच आपणास काही तांत्रीक अडचणी असल्यास त्याचा Screenshot कृपया **support@nmu.ac.in** ई-मेलवर पाठवावा. किंवा ०२५७-२२५७४५३ या दुरध्वनीवरून संपर्क साधु शकतात, तसेच विहीत नमुना व माहीती भरण्यासंबंधी काही अडचणी असल्यास **development@nmu.ac.in** ई-मेल करावा किंवा ०२५७-२२५७२२५ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादरः-**

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव